**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा)**

**जनसंपर्क विभाग**

================================================================================

जा.क्र. जसंवि/प्रसिद्धी पत्रक / १०८८ / २०२०　　　　　　　　　　　　　　　　　　दि. १७ /०७/२०२०

**प्रसिद्धी पत्रक**

**फोर्ट इमारत दुर्घटनेचा वस्तुस्थिती अहवाल**

मुंबई, १७ जुलै, २०२० ः मुंबईच्या फोर्ट परिसरातील पाच मजल्याच्या भानुशाली या इमारतीचा काही भाग गुरुवारी सायंकाळच्या सुमारास कोसळला. म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ या घटनेचा वस्तुस्थिती अहवाल तयार केला आहे. सदरील अहवाल खालीलप्रमाणे...

मुंबई शहराच्या अत्यंत मध्यवर्ती भागातल्या फोर्ट परिसरातील ३५ मिंट रोड येथील उपकरप्राप्त भानुशाली इमारतीचा मागील बाजूचा भाग गुरुवारी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास कोसळला होता. तळमजल्यासह पाच मजले असलेली ही इमारत १०० वर्षे जुनी होती.

दुर्घटनाग्रस्त इमारतीस दुरुस्तीची आवश्यकता असल्याने मालक/रहिवाशांच्या मागणीनुसार इमारतीतील सहा भाडेकरु/ रहिवाशांना इमारतीच्या दुरुस्तीकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण १९७६ च्या कायदा कलम १०२ नुसार ना-हरकत प्रमाणपत्र (विना परताव्यासह) देण्यात आले होते. या तरतुदीनुसार मालक आणि भाडेकरु इमारतीचा सेस न वापरता स्वखर्चाने इमारतीची दुरुस्ती करु शकतात. त्याचबरोबर ना-हरकत प्रमाणपत्रासोबत म्हाडाने रहिवाशांच्या सुरक्षेबाबतचे हमीपत्र देखील संस्थेकडून प्राप्त करवून घेतले होते. ना-हरकत प्रमाणपत्र देते वेळी इमारतीत एकूण २७ निवासी व ३१ अनिवासी गाळे होते.

त्यानंतर संस्थेने महापालिकेकडून इमारतीच्या दुरुस्तीकरीता आयओडी व सीसी जून २०१९ मध्ये प्राप्त करवून घेतले होते. ना-हरकत प्रमाणपत्रधारकांना सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असलेली आयओडी/ नकाशे बृहन्मुंबई महापालिकेमार्फत २ जून २०१८ रोजीच प्रदान करण्यात आले होते. शिवाय त्यानंतर इमारत दुरुस्तीचे काम सुरु करण्याकरीता आवश्यक असणारा परवाना देखील १ जून २०१९ रोजी महापालिकेमार्फत देण्यात आला होता.

दरम्यान मंडळातर्फे दुर्घटनाग्रस्त इमारतींमधील रहिवाशांकरीता संक्रमण शिबीरात मागणीनुसार जागा देखील उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

वैशाली गडपाले,
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा.